# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(दुपार)**

---

**दिनांक ०९.०९.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०८.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये २५ केसेसमध्ये २६ ईसमावर कारवाई करून एकुण ६,२५,०६१/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०७ केसेसमध्ये ०८ इसमांवर कारवाई करून एकुण २२,३५५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,१३५ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. ९,२१,३५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

दिनांक ०८.०९.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०९.०९.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये **कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ३४ इसमावर** कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गणेशपेठ पोलीसांची कामगिरी :— प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ बाळगणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०८.०९.२०२६ चे १०.०० वा. ते १५.०० वा. चे दरम्यान, गणेशपेठ पोलीसांचे पथक पोलीस ठाणे हद्दीत, पेट्रोलींग करीत असतांना, जाधव चौक ते घाट रोड दरम्यान व्यायाम शाळेकडे जाणाऱ्या रोडचे कडेला एक पांढऱ्या रंगाची क्रेटा कार क्र. एमएच. १४ जेएम ६९९३ ही संशयीतरित्या दिसल्याने, चालकाजवळ जावुन, त्यास गाडीचे कागदपत्राबाबत विचारपुस केली असता, त्याने कोणतेही समाधानकारक उत्तरे दिली नाही व गाडी त्याची नसुन राजु गौड याचे मालकीची असुन, त्यांचेकडे कागदपत्र असल्याचे सांगीतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव अनिल ओमप्रकाश गौतम, वय २९ वर्षे, रा. विद्या नगर, पिंपरी चिंचवड, पुणे असे सांगीतले. त्याचे ताब्यातील क्रेटा कार ची झडती घेतली असता, त्यामध्ये पाच खाकी रंगाचे बॉक्स मिळुन आले. बॉक्सची पाहणी केली असता, त्यामध्ये कोणताही वैधानिक ईशारा किंवा चित्र नसलेल्या विदेशी सिगारेट दिसुन आल्या. आरोपीचे ताब्यातुन ईएसएसई लाईट, ईएसएसई स्पेशल गोल्ड, मार्लब्रो अशा नावाचे सिगारेट एकुण २८६० पाकीटे किंमती २,९३,८००/—रू. चा मुद्देमाल मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन सिगारेट, वाहन, ०१ मोबाईल फोन, असा एकुण १०,९४,८००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीस विचारपुस केली असता, त्याने तो फक्त गाडी चालविण्याकरीता आलेला आहे व त्याचे सोबत आलेला लष्करे नावाचा ईसम मोबाईलधारक याने गाडीमध्ये बॉक्स टाकुन कुठेतरी गेल्याचे सांगीतले. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थ सिगारेट्स बेकायदेशीर व अवैधरित्या विक्री करीता बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने, पोलीस ठाणे गणेशपेठ येथे आरोपीविरूध्द कलम ७(२), २०(२)

सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने (जाहीरातीस प्रतीबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन पुरवठा व वितरण यांचे विनिमयन) अधिनीयम—२००३ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. अतुल तवाडे यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि. अरूण पाटील, पोअं. प्रकाश जाधव, राम यांनी केली.

**<u>३) गुन्हेशाखा वाहनचोरी विरोधी पथक पोलीसांची कामगीरी :— ट्रॅव्हल्स बस चोरी करणाऱ्या आरोपींना अटक.</u>**

दिनांक ०८.०६.२०२६ चे १०.०० वा. ते दिनांक २६.०६.२०२६ चे १५.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत मौजा वेळाहरी, खसरा नं. १६ मधील, प्लॉट नं. १६४, नागपूर येथे फिर्यादी मोहम्मद रफीक मोहम्मद युसुफ, वय ५८ वर्षे, रा. प्लॉट क्र. ११, नागपूर हाऊसिंग सोसायटी, झिंगाबाई टाकळी, मानकापुर यांनी त्यांची अमीना ट्रॅव्हल्स नावाचे ट्रान्सपोर्ट व्यवसायातील एक जुनी झालेली ट्रॅव्हल्स बस क्र. एमएच ३१ डब्ल्यु ७९३२ किंमती २,७५,०००/—रू. ची घटनास्थळी लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद बस चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा वाहनचोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपी क्र. १) सय्यद अहमद सय्यद हमीद, वय ४७ वर्षे, रा. कुंदनलाल गुप्ता नगर, यशोधरानगर, नागपूर २) अहराज शेख उर्फ राजा ईजाज शेख, वय ३० वर्षे, रा. किदवाई ग्राऊंड जवळ, लष्करीबाग, नागपुर यांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली देवुन, नमुद वाहनाचे सुटे भाग करून, विकल्याचे सांगीतले. बसचोरीचा गुन्हा उघडकीस आणुन, आरोपींना पुढील कारवाईकामी बेलतरोडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, वाहनचोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी केली.

**<u>४) गुन्हेशाखा पोलीसांची कामगिरी :— शस्त्र बाळगणाऱ्या हद्दपार ईसमास अटक.</u>**

दिनांक ०९.०९.२०२६ चे ०३.१५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा विभाग व युनिट क्र. १ पोलीसांचे पथक हे गुन्हेगार तपासणी मोहीम राबवित असता, पोलीस ठाणे वाडी हद्दीत सोनबा नगर, न्यु स्टार पब्लीक स्कुल जवळ, खडगांव रोड, लाव्हा येथे राहणारा हद्दपार ईसमास चेक केले असता, तो राहते घरी मिळुन आला. पंचासमक्ष त्याचे नांव विचारले असता, त्याने त्याचे नांव अशोक उर्फ भोला मोहन निंबाळकर, वय ४१ वर्षे असे सांगीतले. त्याचे घराची झडती घेतली असता, त्याचे पलंगावरिल गादीखाली एक लोखंडी मोठा कोयता किंमती अंदाजे ५००/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने, जप्त करण्यात आला. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही पुर्वपरवानगी न घेता, कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्र बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे वाडी येथे आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १४२, १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी वाडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. प्रशांत ठवरे, सपोनि. राजाभाऊ जाधव, शिवाजी नन्नावरे, पोहवा. प्रितम यादव, नितीन वासने, लक्ष्मण चौरे, कुणाल बोडखे, पोअं. धुळगुंडे, मंगेश बोरकुटे यांनी केली.



**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे राणाप्रताप नगर :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०८.०९.२०२६ चे १२.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचे काका नामे पांडुरंग भिवरूजी बोकडे, वय ७८ वर्षे, रा. प्लॉट नं. २००, सुयोग नगर, अजनी, नागपुर हे त्यांचे सुझुकी एक्सेस मोपेड क्र. एमएच. ७९ ए ६०६७ ने नरेंद्र नगर पुलीया कडुन छत्रपती चौकाकडे जात असतांना, पोलीस ठाणे राणाप्रताप नगर हद्दीत छत्रपती नगर, छत्रपती सभागृहासमोर आयशर ट्रक क्र. एमएच. ४० सिटी ६७५३ चा चालक नामे अखिलेश मुकेश कसार, वय २९ वर्षे, रा चौराई, जि. छिंदवाडा (मध्य प्रदेश) ह.मु.— दिघोरी, नागपुर याने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे काकाचे वाहनास मागुन धडक दिल्याने ते गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता मेडीकल व तेथुन मिलीट्री हॉस्पीटल, कन्टोन्मेंट कामठी येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक ०९.०९.२०२६ चे ०७.०५ वा. डॉक्टरांनी त्यांना मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी दिनेश वामनराव पौनिकर, वय ४५ वर्षे, रा. प्लॉट नं. ३४, श्रीराम सोसायटी, शांतीनगर, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे राणाप्रतापनगर येथे सपोनि. राहुल कातकाडे ९८८१९०९६२१ यांनी आयशर ट्रक चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१), २८१ भा.न्या.सं., सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे गणेशपेठ** :— दिनांक ०८.०९.२०२६ चे १५.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत चाचा नेहरू उद्यान, गांधीसागर तलावाचे पाण्यात एक ३५ ते ४० वर्षीय इसमाचा मृतदेह तरंगतांना मिळून आला. गोताखोर नामे जगदीश खरे व फायर ब्रिगेड यांचे मदतीने प्रेत पाण्याबाहेर काढुन उत्तरीय तपासणी करीता मेयो हॉस्पीटल येथे पाठविण्यात आले. मृतकाची ओळख पटलेली नाही. वर्णन वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे, रंग निमगोरा, चेहरा गोल, केस काळे, दाढी—मिशी बारीक, अंगात काळ्या रंगाचा फुलबाहीचा शर्ट व ग्रे रंगाचा फुलपॅन्ट, पॅन्टचे आंत डिएमआर कंपनीची अंडरवियर घातलेले असुन, कत्थ्या रंगाचा बेल्ट घातलेला आहे. उजवे हातात काळ्या हिरव्या रंगाचा धागा बांधलेला असुन, हातावर दिल आकाराचे चिन्ह गोंदलेले आहे. कमरेमध्ये शेंदरी रंगाचा धागा व त्यात ताबीज बांधलेले आहे. अशा वर्णनाचे ईसमाची ओळख पटविण्यासाठी पोलीस ठाणे गणेशपेठ येथे संपर्क करावा.

याप्रकरणी फिर्यादी दर्शन दिलीप चौधरी, वय २७ वर्षे, रा. सिरसपेठ, ईमामवाडा, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे मसपोनि. सोमनकर यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे धंतोली :–** दिनांक ०८.०९.२०२६ चे १८.३० वा. ते १९.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे धंतोली हद्दीत अजनी रेल्वे स्टेशन पोल नं. ८३४/४ ते ८३४/६ दरम्यान रेल्वे ट्रॅकवर एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ३५ वर्षे वयाचे, रेल्वेने अपघात होवुन कटलेल्या, मृत अवस्थेत मिळुन आले. पोलीसांनी शव पुढील कार्यवाहीस्तव मेडीकल हॉस्पीटल येथे पाठविले आहे. मृतकांची ओळख अद्याप पटलेली नाही.

यांप्रकरणी फिर्यादी रेल्वे ट्रॅकमॅन जगदीश शिवपाल कामडी, वय ४० वर्षे, रा. पार्वती नगर, प्लॉट नं. १५, जिवन शाळेजवळ, अजनी, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे धंतोली येथे सपोनि. चंद्रकांत कोसे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/–**
**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

## वाहतुक शाखेची प्रेसनोट– १

सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, नागपूर शहरात दिनांक ११.०९.२०२६ रोजी बडग्या/मारबत उत्सव मंडळाची स्थापना करण्यात येवुन, त्यांची मिरवणुक काढण्यात येणार आहे. बडग्या मारबत मिरवणुकीला प्रामुख्याने पिवळी मारबत चौक, जुना मोटर स्टॅन्ड चौक, शहिद चौक, गांधीपुतळा चौक, महाल, गांधीगेट चौक, जागनाथ बुधवारी चौक हा मार्ग राहणार असुन बड्ग्या, पिवळी मारबत व काळी मारबतीची मिरवणूक या मार्गावर एकत्र येवून पुढे जात असते. मिरवणुक पाहण्याकरीता लोकांची प्रचंड गर्दी होवुन वाहतुकीची समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. त्याकरीता शहरातील वाहतूक सुरळीत राहावी व सामान्य नागरीकांना धोका, गैरसोय किंवा अडथळा निर्माण होवु नये म्हणुन खालील प्रमाणे वाहतूक नियमन करण्याचा दृष्टीने वाहतुकीवर निर्बंध घालण्याकरीता बडग्या, पिवळी व काळी मारबत मिरवणुक खालील प्रमाणे दिलेल्या मार्गावरून जाईल, त्यावेळी मार्गावर आवश्यकतेनुसार वाहतूक थांबविण्यात येईल किंवा वळविण्यात येईल.

१. मोठी पिवळी मारबत जागनाथ बुधवारी येथुन निघाल्यावर गोळीबार चौकात येण्यापुर्वी गांजाखेत कडून गोळीबार चौकाकडे येणारी वाहतूक तिननल चौक, नालसाहब चौक कडे वळविण्यात येत आहे. तसेच गार्ड लाईन कडुन मोमिनपुरा चौक मार्गे गोळीबार चौकाकडे येणारी वाहतूक मोमिनपुरा चौकातुन भगवाघर चौक मार्गे दोसर भवन चौकाकडे वळविण्यात येईल.
२. कमाल चौकातुन गोळीबार चौकाकडे येणारी वाहतूक बाळाभाऊ पेठ, वैशाली नगर चौकाकडे वळविण्यात येईल.
३. काळी मारबत निघते वेळी शांतीनगर कडुन दहीबाजार पुलीया मार्गे मारवाडी चौक कडुन नेहरू पुतळयाकडे जाणारी वाहतूक जुना मोटार स्टॅन्ड कडे वळविण्यात येईल.
४. पिवळी मारबत निघते वेळी नेहरू पुतळया कडे जाणारी वाहतूक जुना मोटार स्टॅन्ड मार्गे चंद्रशेखर आझाद चौका कडे वळविण्यात येईल. तसेच परतीचा वेळी शांतीनगर कडून येणारी वाहतूक दही बाजार पुलीया खालुन लालगंज, मेंहदीबाग पुलीया अंडरब्रिज कडुन वैशाली नगर कडे वळविण्यात येईल.
५. बडग्या मिरवणुक डिप्टी सिग्नल येथुन निघते वेळी व परतीच्या वेळी डिप्टी सिग्नल कडे जाणारी वाहतूक ही वर्धमान नगर चौक मार्गे प्रजापती रेल्वे क्रॉसिंग व हिवरी नगर चौकाकडे वळविण्यात येईल.

६. नेहरू पुतळा चौक येथे मारबत भेट असल्याने व मिरवणुकीचा मार्ग असल्याने मारवाडी चौकाकडून येणारी वाहतूक इतवारी पुलीया तसेच जुना मोटर स्टॅन्ड कडे वळविण्यात येईल. तसेच जड वाहनांना राणी दुर्गावती चौकातून वळविण्यात येईल.

७. तिननल चौकाकडून भारत माता चौकाकडे येणारी तसेच शहीद चौकातुन मस्कासाथ चौकाकडे येणारी वाहतूक ही गांजाखेत कडे तसेच नंगापुतळा व गांधीपुतळा कडे वळविण्यात येईल.

८. गांधीपुतळा चौकात मिरवणुक आल्यानंतर संत्रा मार्केट ओव्हर ब्रिज कडुन येणारी वाहतूक ही अग्रसेन चौकातुन गोळीबार चौकाकडे व चिटणीस पार्क चौकाकडे वळविण्यात येईल तसेच जयस्तंभ चौकातून जड वाहतूकीस मानस चौक मार्गे वळविण्यात येईल.

९. टेलीफोन एक्सचेंज चौकाकडुन संत्रा मार्केट ओव्हर ब्रिज कडे येणारी वाहतूक चंद्रशेखर आझाद चौकातुन जुना मोटर स्टॅन्ड चौकाकडे व लाकडीपुल चौकाकडे वळविण्यात येईल. तसेच जड वाहतूकीस टेलीफोन एक्सचेंज चौकातून गंगाबाई घाट चौकाकडे वळविण्यात येईल.

१०.बडकस चौकात मिरवणुक येणेपुर्वी बडकस चौकात चिटणीस पार्क चौकातुन येणारी वाहतूक गांधीगेट कडे व अग्रसेन चौकाकडे वळविण्यात येईल. व लाकडीपुलाकडुन बडकस चौकाकडे येणारी वाहतूक चंद्रशेखर आझाद चौकाकडे तसेच झेंडाचौक महाल कडे वळविण्यात येईल.

११.महाल चौकात मिरवणुक येणेपुर्वी महाल चौकात झेंडा चौकातुन येणारी वाहतूक लकडापुल तसेच भोलागणेश चौकाकडे वळविण्यात येईल. तसेच गांधीगेट कडुन येणारी वाहतूक चिटणीस पार्क चौकाकडे व रामकुलर चौक तसेच टिळक पुतळयाकडे वळविण्यात येईल.

१२.गांधीगेट येथे मिरवणुक येणेपुर्वी राम कुलर चौकाकडुन येणारी वाहतूक मॉडल मिल चौकाकडे तसेच सि.पी. ॲन्ड बेरार कॉलेज कडे वळविण्यात येईल व टिळक पुतळयाकडुन गांधीगेट कडे येणारी वाहतूक नातीक चौक तसेच गणेश मंदीर कडे वळविण्यात येईल. तसेच चिटणीस पार्क चौकाकडुन येणारी वाहतूक बडकस चौक व नातीक चौकाकडे वळविण्यात येईल.

१३.चिटणीस पार्क चौक येथे मिरवणुक येणेपुर्वी बडकस चौकातुन येणारी वाहतूक महाल चौकाकडे तसेच गांधीपुतळयाकडे वळविण्यात येईल. नातीक चौकातुन येणारी वाहतूक टिळक पुतळा तसेच एम्प्रेस मॉलसिटी कडे वळविण्यात येईल. तसेच अग्रसेन चौकाकडुन चिटणीस पार्क कडे येणारी वाहतूक संत्रामार्केट ओव्हर ब्रिज व गांधीपुतळया कडे वळविण्यात येईल.

१४.अग्रसेन चौकात मिरवणुक येणेपुर्वी गांधीपुतळया कडुन येणारी वाहतूक बडकस चौकाकडे व टांगा स्टॅन्ड कडे वळविण्यात येईल. व संत्रा मार्केट ओव्हर ब्रिज कडुन येणारी वाहतूक कॉटन मार्केट चौक व गार्ड लाईन कडे वळविण्यात येईल.

१५.गांजाखेत चौकात मिरवणुक येणेपुर्वी कमाल चौकाकडुन गोळीबार चौकाकडे येणारी वाहतूक वैशाली नगर कडे वळविण्यात येईल. तसेच मोमिनपुरा चौकातुन गोळीबार चौकात येणारी वाहतूक मोमीनपुरा चौकातुनच भगवाघर चौकाकडे वळविण्यात येईल.

१६.काळी मारबत गांजाखेत चौकातुन जुना भंडारा रोडने हरीहर मंदीराकडे जात असतांना तिननल चौक, ाहीद चौक, सुनिल हॉटेल चौक या ठिकाणी बाहेर येणारी वाहतूक बंद करण्यात येईल. तसेच जुना भंडारा रोडने सुनिल हॉटेल चौकाकडे येणारी वाहतूक बंद करण्यात येईल. पॉवर हाऊस चौकाकडुन येणारी वाहतूक सुनील हॉटेल कडुन डावे वळण घेवुन टेलीफोन एक्सचेंज चौक मार्गे वळविण्यात येईल.

१७.बडग्या मिरवणुक डिप्टी सिग्नल येथुन निघतेवेळी व परतीच्या वेळी डिप्टी सिग्नल कडे जाणारी वाहतुक वर्धमान नगर चौक मार्गे प्रजापती रेल्वे क्रसिंग व हिरवी नगर चौकाकडे वळविण्यात येईल.

**सदर अधिसुचना दि. ११.०९.२०२६ रोजी ०७.०० वाजे पासुन बडग्या, पिवळी व काळी मारबत मिरवणुक संपेपर्यंत अंमलात राहील.**

तरी सर्व नागरीकांना विनंती करण्यात येते की, सुलभ वाहतूकीकरीता तसेच वाहतूकीस अडथळा निर्माण होवू नये म्हणुन उपरोक्त प्रमाणे काढण्यात आलेल्या आदेशाची बजावणी करण्याकरीता सहकार्य करावे.

## वाहतुक शाखेची प्रेसनोट— २

वाहतूक परिमंडळ कॉटन मार्केट नागपूर शहर हद्दीत अग्रसेन चौक ते गोळीबार चौक दरम्यान एन.सी.सी कंपनी तर्फे उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. त्यामुळे लालईमली चौक ते गांजाखेत चौक पर्यंत एकाबाजुने सर्व्हीस रोडवर एकेरी मार्गाने दुहेरी वाहतूक सुरू असल्याने तेथे नेहमी वाहतूकीची कोडीं होत असते. सदर रस्त्यावर वाहतूकीची कोंडी होवु नये म्हणुन त्या रस्त्याला एकेरी (वनवे) घोषित करणे आवश्यक आहे. त्यामुळे खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

**लालईमली चौक ते गोळीबार चौकापर्यंत रस्त्याला एकेरी (वनवे) घोषित करण्यात येत आहे.सदर रस्त्यावरील वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

- लाल ईमली चौक ते अग्रसेन चौकाकडुन गांजाखेत व गोळीबार चौकाकडे जाणारी वाहतूक ऐकेरी राहील.
- गांजाखेत चौकाकडुन लालईमली चौकाकडे जाणारी वाहतूक ही गांजाखेत चौकातून डावे वळण घेवुन हॅन्डलुम मार्केट मार्गे दवाई मार्केट रोडने अग्रसेन चौकाकडे जातील.

**सदर अधिसुचना दिनांक ०९.०९.२०२६ रोजी पासून ते दिनांक ०८.१०.२०२६ पर्यत अंमलात राहील.**

नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

स्वा/—

**(आदित्य मिरखेलकर, भापोसे)**

पोलीस उप आयुक्त,वाहतुक,

नागपूर शहर.